

Dr. Prakash Parienkar, Associate Professor of Konkani, was honoured for his outstanding contribution to the revival of freshwater river silt-based cultivation, known as 'Puran Sheti.' The prestigious felicitation was conferred by the Honorable Chief Minister of Goa, Dr. Pramod Sawant, on behalf of the Goa State Biodiversity Board, Government of Goa, during the commemoration of 'Environment Day' at the Entertainment Society of Goa, Panaji, on June 5th, 2024.



गोमन्तक GOMANTAK TV




# पुरण शेती पुनर्जिवीत केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांकडून सन्मान

**धावे-तार, सत्तरी येथे पुरण शेती पुनर्जिवीत केल्याबद्दल डॉ. प्रकाश पर्येकर आणि पुरण शेतकऱ्यांचा पर्यावरण दिन सोहळ्यात मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांच्या हस्ते सन्मान.**

---

NEWS सह्याद्री मीडिया




## BREAKING NEWS

**धावे तार सत्तरी येथे पुरण शेती पुनर्जिवीत केल्याबद्दल डॉ प्रकाश पर्येकर आणि पुरण शेतकऱ्यांचा पर्यावरण दिन सोहळ्यात मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत यांच्या हस्ते सन्मान.**

लोकमत

# इटीपी प्रकल्प नसल्यास कारखाने, कंपन्या बंद करू

## मुख्यमंत्री : दूषित पाणी थेट नाल्यात सोडणाऱ्यांना दिला इशारा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पणजी** : राज्यातील कारखाने, कंपन्यांनी दूषित पाणी आपल्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पात (इटीपी) साठवावे. ज्यांच्याकडे हा प्रकल्प नाही असे कारखाने, कंपन्या बंद कराव्या लागणार आहेत, असा इशारा मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी दिला.

पर्यावरण खाते, गोवा प्रदूषण नियंत्रण मंडळ व गोवा जैवविविधता मंडळ यांच्यावतीने आयोजित केलेल्या जागतिक पर्यावरण दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते. व्यासपीठावर पर्यावरण मंत्री आलेक्स सिक्वेरा, आमदार आलेक्स रेजिनाल्ड लॉरेन्स, मुख्य सचिव पुनीत गोयल यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

राज्यातील पर्यावरणाचे संवर्धन करणे ही सरकारची जबाबदारी नसून सर्वांची आहे. त्यामुळे कंपनी, कारखान्यांनी पर्यावरणाच्या जतनाचा पुढाकार घ्यावा. त्यांनी दूषित पाणी नदी नाल्यात सोडू नये. तसेच हॉटेल व्यावसायिकांनी रस्त्यावर कचरा फेकू नये, लोकांनी घरातील कचरा रस्त्यावर फेकू नये, कचरा व्यवस्थापनासाठी सरकार कोट्यवधी रुपये खर्च करत आहे. त्यामुळे सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.




पुरणशेती पुनर्जिवीत केल्याबद्दल डॉ. प्रकाश पर्येकर यांच्यासह पुरण शेतकऱ्यांचा गौरव करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. (छाया : गणेश शेटकर)

### पंचायतींना निधी वाढवून देणार

मुख्यमंत्री म्हणाले, ज्या पंचायती आपल्या भागातील कचऱ्याचे नियोजन करतात त्यांना सरकारकडून निधी वाढवून दिला जाणार आहे. तसेच त्यांना सरकार हरित प्रमाणपत्र दिले जाणार आहे. यंदा ठाणे आणि मेणकुरे पंचायतीला दिले आहे. तसेच पुढे शाळांनाही असे हरित प्रमाणपत्र दिले जाणार आहे, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

### बांबूची लागवड वाढविणार : सावंत

मुख्यमंत्री म्हणाले, जमिनीची धूप होऊ नये यासाठी सरकार या वर्षापासून बांबू लागवडीवर भर देणार आहे. यासाठी ९ प्रजातींचे बांबू सरकारकडून मोफत दिले जाणार आहेत. तसेच ५ वर्षांनी ते परत विकत घेण्याची सोयही केली जाणार आहे. लोकांनी आपल्या जमिनीत बांबू लागवड करावी, जेणेकरुन जमिनीची धूप होणे कमी होईल, असेही मुख्यमंत्री म्हणाले. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पर्यावरणाचे जतन करतात अशा कंपनी तसेच पंचायतींना हरित प्रमाणपत्र देण्यात आले.

### सर्वांचे सहकार्य हवे

पर्यावरण मंत्री आलेक्स सिक्वेरा म्हणाले, पर्यावरणाच्या जतनासाठी सर्वांनी सहकार्य करावे. सरकार विविध उपक्रम राबवित आहे. लोकांनी सेंद्रिय खताचा वापर करावा, पाणी वाया न घालवता योग्य वापर करावा. वीज वाया न घालवता त्याचाही योग्य वापर करावा, अशा काही सोप्या गोष्टी आम्ही केल्य तर पर्यावरणाचे जतन होऊ शकते.


Achievements of GSBB
First batch of traditional healers receiving Vaidya Mitra Cards at the hands of Dr. Pramod Sawant, Hon'ble. Chief Minister of Goa.
Livelihood initiatives by GSBB